# REPORT :- 13-12-2021

मॉडर्न महविद्यालय कला, विज्ञान व वाणिज्य (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-०५

राष्ट्रीय सेवा योजना

ठिकाण - लोकसेवा प्रतिष्ठानाचे नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिक शाळा, मौजे. फुलगाव (माळवाडी) , ता. हवेली, जि. पुणे.

दिनांक - १३/१२/२०२१

वेळ - संध्याकाळी ०६ : ०० ते रात्री ०८ : ०० वाजेपर्यंत.

लिंग भेद संवेदनीकरण अभियान (आदर भिन्नतेचा).

आज दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी "लिंग भेद संवेदनीकरण __आदर भिन्नतेचा " हे अभियान स्वंयसेवीका आफशाँ मशायक आणि स्वंयसेवक अंकित भरद्वाज या दोन्ही स्वंयसेवकांनी सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये चौथ्या दिवशी या अभियानास संध्याकाळी ०६ वाजता सुरूवात केली. या अभियानाचे मुख्य उद्देश अथवा "लिंग भेद संवेदनीकरण अभियान " असे का म्हणून शिर्षक देण्यात आले, तसेच अश्याच अनखी गोष्टी रा. से. यो. च्या सर्व स्वंयसेवकांनसमोर या अभियानामार्फत मांडण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात होताच, अभियानाचे थोडक्यात परिचय अथवा माहिती अंकित भरद्वाज या स्वंयसेवकाने अभियानाचे अगदी विश्लेषणात्मक परिचय दिला आणि परिचय देताना अगदी सहज रित्या, "अलग होना, यह अलग होना नहीं होता। " या वाक्याने या अभियानाचा जणू संपूर्ण अर्थच सामावून घेतला आणि आफशाँ मशायक या स्वंयसेवीकाने अभियान दरम्यान पाळावयाचे नियम अगदी सोप्या भाषेत मांडले.या सुवर्ण सुरूवातानंतर हा कार्यक्रम ज्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला, ते म्हणजे रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रभाकर वराडे सर यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच नंतर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. पल्लवी मथ मॅडम, प्रा.प्रियंका जोशी मॅडम, प्रा.अल्फि जूब्त मॅडम, प्रा.साद अहेमद सर उपस्थित होते. यांच्यापैकी पल्लवी मथ मॅडम यांनी देखील आम्हा सर्वांना मार्मिकरित्या मार्गदर्शन केले. याच बरोबर पुर्वा संकपाल या ही स्वंयसेवीके ने या विषयावर सर्व स्वंयसेवकांशी संवाद साधला व फक्त मनोगतच नव्हे, तर या संवादातून सर्वांच्या मनोदशा दृष्टीस आल्या. या सर्व वकृत्व अथवा मनोगता नंतर अभियाना अंतर्गत घेण्यात आलेले अनेक उपक्रम यांची सुरुवात झाली.

एकुण ५-६ उपक्रम अभियाना दरम्यान घेण्यात आले. त्यांची यादी खालीलप्रमाणे,

१.Clapping Activity.

२.Difference Between "Sex And Gender ".

३.Work Activity.

४.Data Source  Activity.

५.Equation Activity.

६.Hand Shake Activity.

अश्या प्रकारे उपक्रम राबविण्यात आले व नंतर अंकित भरद्वाज या स्वंयसेवकाने " परस्पर पुरकता (  Mutual Understanding) "  म्हणजे नेमके काय  ? या सर्व उपक्रमांची उदाहरणे देऊन स्पष्ट केले व अखेरिस " लिंग भेद संवेदनीकरण अभियान " याच्या वर आधारित गीत गायन झाले. शेवटी सर्वांना तीन प्रश्न विचारून, प्रतिसाद एका पृष्ठावर नोंदवून जमा करण्यात आला व शेवटी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानून कार्यक्रमाची / अभियानाची सांगता झाली. या अभियानात तब्बल १०० स्वंयसेवक उपस्थित होते. सर्वांचा अगदी उत्साहजनक प्रतिसाद मिळाला. हा प्रतिसाद पाहता आजचा कार्यक्रम सार्थक झाला असे म्हणण्यास पण काही वावगे नाही.

***NSS UNIT OF MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE, (AUTONOMOUS), SHIVAJINAGAR, PUNE-05***

***(NATIONAL SERVICE SCHEME)***

***GENDER SENSITIVITY CAMPAIGN***

**VENUE :- NETAJI SUBHASH CHANDRA BOSE BOYS MILITARY SCHOOL (NSBBMS) ,PHULGAON ,**

**PUNE, 412216**

**Date- 13/12/2021**

**Time- 6:00 pm to 8:00 pm!**

We had organised the gender sensitivity campaign in NSS Camp which was on fourth day (13/12/2021). This campaign was organised by two Nss Volunteers Afsha Mashayak and Ankit Bhardwaj.The chief guest of this campaign that day were Pallavi Math ma'am, Priyanka joshi ma'am,Alphy Jubit ma'am, Saad Ahmad Sir and NSS P.O. Dr. Prabhakar Varade sir were present .

In this campaign first Ankit Bhardwaj introduced the topic about campaign and Afsha Mashayak gives the instruction about campaign after that Prabhakar Varade sir and Pallavi Math ma'am introduced about it to all the volunteers.Then Campaign started. In this campaign we had conducted many types of activity on Gender Sensitivity. There were 5-6 activities which were Clapping activity, Difference between sex and gender, Work activity, Data source question , Equation activity and Hand shake activity.In between activity timing our Nss volunteer Purva Sankpal kept debet on this topic gender sensitivity with other volunteers.

Ankit Bhardwaj had also given some information on Mutual understanding.

100 NSS Volunteers were present for the campaign. We also took reviews from all the NSS Volunteers.The campaign was ended by Ankit Bhardwaj by giving a vote of thanks.



